**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहारमधे उद्या विधानसभा निवडणुकीची मतमोजणी
- आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ
- भारताच्या प्रोजेक्ट चित्तासाठी बोत्सवानाकडून ८ चित्त्यांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत प्रतिकात्मक हस्तांतरण
- दिल्ली स्फोटातल्या हल्लेखोराची ओळख पटली

**आणि**

- राजकोट इथं सुरु असलेल्या एक दिवसीय क्रिकेट सामन्यात दक्षिण अफ्रिका अ- संघाचं भारत अ- संघापुढं विजयासाठी २८६ धावांचं आव्हान

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या सकाळी आठ वाजल्यापासून होणार आहे. ३८ जिल्ह्यांमधे मिळून ४६ मतमोजणी केंद्र आहेत. बिहारमध्ये या निवडणुकीत १९५१ नंतर विक्रमी मतदान झालं आहे. ६१६ उमेदवाराचं भवितव्य असलेले ईव्हीएम त्रिस्तरीय सुरक्षा निगराणीखाली ठेवले आहेत, अशी माहिती बिहारचे मुख्य निवडणूक अधिकारी विनोद सिंग गुंजीयाल यांनी दिली. सर्वप्रथम टपालानं आलेल्या मतपत्रिका मोजल्या जातील, त्यानंतर ईव्हीएम वरची मतमोजणी सुरु होईल. मतमोजणीसाठी ४ हजारहून अधिक टेबल मांडले आहेत.

नमुना १७ क आणि ईव्हीएम डाटा जुळत नसेल, आणि जिथं प्रात्यक्षिकाचा डेटा नष्ट करायचा राहीला असेल, तिथं व्हीव्हीपॅट मोजणी अनिवार्य करण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं दिले आहेत.

**<><><><>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात सुमारे २५ हजार कोटी रुपये खर्च करून करण्यात येणारी पायाभूत सुविधांची कामं पुढची २५ वर्षं टिकतील अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. नाशिकमध्ये पुढच्या वर्षी सुरू होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा प्रारंभ आज मुख्यमंत्री फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज झाला. त्यावेळी ते बोलत होते. कुंभमेळ्याच्या सिंहस्थ पर्वाविषयी मुख्यमंत्री म्हणाले…

**होल्ड... बाईट - मुख्यमंत्री (१४ सेकंद)**

नाशिकचा कुंभमेळा स्वच्छ सुंदर आणि सुरक्षित व्हावा यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न सुरू आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

या कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी रामकुंड परिसरात सुरू असलेल्या कामांची पाहणी केली तसंच राम काल पथ या प्रकल्पाचं भूमिपूजन केलं. यानंतर नाशिक जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

**<><><><>**

भारताच्या प्रोजेक्ट चित्ताला बोत्सवानाने  ८ चित्त्यांची देणगी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत आज गॅबोरोन संरक्षित अरण्यात या प्रतिकात्मक हस्तांतरणाचा सोहळा झाला. बोत्सवानाचे अध्यक्ष ड्यूमा बोको देखील यावेळी उपस्थित होते. बोत्सवानातल्या घांझी जंगलातून आणलेले हे चित्ते भारतात पोहोचल्यावर त्यांना सुरुवातीला काही काळ विलगीकरणात ठेवलं जाईल.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज बोत्सवानामधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. २०४७ पर्यंत विकसित भारत निर्माणाच्या यात्रेत तिथले भारतीयही सोबतीला आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी शेती आणि शेतकरी कल्याण विभागानं देशभरात चालवलेल्या अभियानात आतापर्यंत ३ लाखांहून अधिक ठिकाणी छापेमारी केली असून सुमारे साडेतीन हजारांहून जास्त दुकानांचे परवाने रद्द केले आहेत. या कारवाईत ४१८ जणांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. तसंच राज्यातल्या सुमारे एक हजार दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले.
महाराष्ट्रासह  उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार, हरियाणा, पंजाब, ओदिशा या राज्यात छापेमारी करण्यात आली. या कारवाईमुळे खतांचा कृत्रिम तुटवडा आणि किमतीत केलेले फेरफार रोखता येतील.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचं बियाणं परवडणाऱ्या दरात मिळावं तसंच बोगस बियाण्याला प्रतिबंध व्हावा याकरता केंद्रसरकारने बियाणे विधेयक २०२५चा मसुदा तयार केला आहे. हे विधेयक १९६६ सालच्या बियाणे कायदा आणि १९८३चा बियाणे नियंत्रणआदेश यांची जागा घेईल. बियाणे पुरवठा साखळीत पारदर्शकता, आणि जबाबदारी निश्चित करुन शेतकऱ्यांचं हितरक्षण हे या कायद्याचं उद्दिष्ट आहे. विधेयकाचा मसुदा शेती आणि शेतकरी कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाला असून येत्या ११ डिसेंबर पर्यंत त्यावर सूचना आणि हरकती नोंदवता येतील.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे.  विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधान भवन परिसरातल्या वसंतदादा यांच्या पुतळयाला  अभिवादन केलं.

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ स्फोट घडवणारी व्यक्ती डॉक्टर उमर उन नबी असल्याचं डीएनए चाचणीतून स्पष्ट झालं आहे. स्फोटानंतर त्याचा पाय स्टीअरिंग व्हील आणि ॲक्सिलरेटरमध्ये अडकला होता. त्याचा डीएनए नमुना त्याच्या आईशी जुळला असल्याची माहिती, दिल्ली पोलिसांनी दिली.

या तपासादरम्यान, अलफलाह विद्यापीठाच्या आवारातून आज आणखी एक कार पोलिसांनी ताब्यात घेतली. हे वाहन, संशयित शाहीन शाहीदच्या नावावर असल्याचं समजतं.

जम्मू काश्मीरमधे जैश ए मुहम्मद या प्रतिबंधित संघटनेशी संबंधित १३ ठिकाणांवर आज छापे टाकण्यात आले.

**<><><><><>**

राजकोट इथं सुरु असलेल्या पहिल्या अनौपचारिक एक दिवसीय सामन्यात दक्षिण अफ्रिका अ-संघानं भारत अ- संघापुढं विजयासाठी २८६ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दक्षिण अफ्रिका अ-संघानं ९ गडी गमावून २८५ धावा केल्या. डेलानो पोजितरनं सर्वाधिक ९० धावा केल्या. डियान फॉरेस्टरनं ७७, तर बिजॉर्न पोर्टइननं ५९ धावांचं योगदान दिलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ३० षटकात २ बाद १५८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट संघ भारताच्या दौऱ्यावर आला आहे. या दौऱ्यात दोन कसोटी सामने होणार असून त्यातला पहिला उद्या कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर सुरु होईल. भारतीय संघाचं नेतृत्व शुभमन गिलकडे असून दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार तेंबा बावुमा आहे.

**<><><><><>**

ढाका इथं झालेल्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताने आज दोन सुवर्ण आणि एका रौप्य पदकाची कमाई केली. महिलांच्या कंपाऊंड सांघिक प्रकारात ज्योती सुरेखा वेण्णम, प्रितिका प्रदीप आणि दीपशिखा यांच्या संघानं कोरियाचा २३६ - २३४ असा पराभव करत सुवर्ण पदक पटकावलं. तर मिश्र सांघिक प्रकारात अभिषेक वर्मा आणि दीपशिखा यांनी बांग्लादेशचा १५३ - १५१ असा पराभव करत विजेतेपद पटकावलं. पुरुषांच्या कंपाऊंड सांघिक प्रकारात अभिषेक वर्मा, साहिल जाधव आणि प्रथमेश फुगे यांच्या संघाचा अंतिम फेरीत कझाकिस्तानच्या संघाकडून पराभव झाल्यानं त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

INVAR रणगाडारोधी क्षेपणास्त्राच्या खरेदीसाठी संरक्षण मंत्रालयाने भारत डायनामिक्स लिमिटेडबरोबर करार केला. २ हजार ९५ कोटी रुपयांच्या या खरेदीमुळे T-90 रणगाड्याची क्षमता वाढणार आहे. या खरेदीमुळे भारतीय लष्कराची क्षमता वाढणार आहे. स्वदेशी संस्थांकडून तंत्रज्ञान घेण्याच्या निर्णयामुळे आत्मनिर्भरतेचा उद्देश साधला जाणार आहे असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आदिवासी गौरव पंधरवड्यानिमित्त माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत भगवान बिरसा मुंडा यांना आदरांजली वाहिली. आदिवासी वीरांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि योगदानाला सलाम करण्यासाठी आदिवासी गौरव पंधरवडा साजरा केला जात आहे. भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त साजऱ्या केल्या जाणाऱ्या आदिवासी गौरव वर्षाचा हा भाग आहे. भगवान बिरसा मुंडा हे देशातले अग्रणी आदिवासी स्वातंत्र्य सेनानी होते.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम आज राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. त्यानुसार, महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठीची प्रारूप मतदार यादी येत्या २० तारखेला जाहीर होईल. २७ नोव्हेंबरपर्यंत त्यावरच्या हरकती आणि सूचना दाखल करता येतील. तर अंतिम मतदार याद्या ५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केल्या जातील. ८ डिसेंबर रोजी मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध होईल तर १२ डिसेंबर रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

<><><><><>

केरळ आणि पुद्दुचेरीच्या माहेमधल्या काही भागात उद्या मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर छत्तीसगड आणि मध्य प्रदेशात थन्डीची लाट पसरण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. ईशान्य भारतात धुकं पसरण्याची तसेच किमान तापमानात घट होण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

//<><><><><>//